# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-४११ ००१

Email id :- mscepune@gmail.com

फोन क्रमांक :- ०२०-२६१२३०६६/६७


जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०२०/ 3184

दिनांक :- 23/११/२०२०

प्रति,

**शासनमान्य संस्थाचालक (सर्व)**
**महाराष्ट्र व गोवा**

**विषय :-माहे जानेवारी/फेब्रुवारी-२०२१ मधील जीसीसी, जीसीसी-टिबीसी आणि जीसीसी-टिबीसी-एसएसडी परीक्षांसाठी विद्यार्थ्यांची उपस्थिती क्षमापित करणेबाबत.**

**संदर्भ :-**१) या कार्यालयाचे पत्र जा.क्र. .२७०० दि. १२/१०/२०२०.
२) या कार्यालयाचे पत्र जा. क्र. १८६४ दि. १६/०६/२०२०.
३) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय दि. ०५ डिसेंबर २०१६.
४) शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे शासन पत्र दि.२९ ऑक्टोबर २०२०.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये जानेवारी / फेब्रुवारी -२०२१ मध्ये प्रस्तावित जीसीसी, जीसीसी-टिबीसी आणि जीसीसी-टिबीसी-एसएसडी परीक्षांची परवानगी संदर्भिय पत्र क्र. ४ अन्वये प्राप्त झाली आहे.

कोविड - १९ या महामारीमुळे शासनमान्य सर्व संस्था सुरु करणेची परवानगी संदर्भिय पत्र क्र. ०२ अन्वये दि.०१/०७/२०२० पासून काही अटी व शर्तींच्या अधीन राहून देण्यात आली. परंतू जिल्हा प्रशासन प्रमुखांनी संस्था सुरु करण्याची परवानगी कोविडच्या स्थानिक परिस्थितीनुसार वेगवेगळ्या जिल्ह्यांना वेगवेगळ्या महिन्यात दिलेली आहे. सर्व संस्था दि.०१/१०/२०२० पासून स्थानिक परवानगीने सुरू झाल्या असे गृहित धरुन सदर परीक्षांसाठी अंदाजे तीन लाख विद्यार्थ्यांची हजेरी पूर्ण होईल त्या दृष्टीने परीक्षेस विद्यार्थी प्रविष्ठ होणेकरिता विद्यार्थ्यांची हजेरी क्षमापित होणे आवश्यक आहे.

संदर्भ क्र.०३ च्या शासन निर्णयान्वये प्रसिध्द महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक टंकलेखन अभ्यासक्रम) मान्यता व संचालन नियम १९९१ ची सुधारीत नियमावली २०१६ चे प्रकरण २ चे नियम १३ (क) नुसार उमेदवाराला/ विद्यार्थ्याला परीक्षेकरीता अर्ज करताना पात्रतेसाठी एकुण कामाच्या दिवसांपैकी ८० % उपस्थिती पुर्ण असणे बंधनकारक आहे.

महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक टंकलेखन अभ्यासक्रम) मान्यता व संचालन नियम १९९१ ची सुधारीत नियमावली २०१६ चे प्रकरण १ मधील मुद्या क्र.११ (अ) (४) नुसार मी आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे माझ्या अधिकाराच्या अनुषंगाने कोविड - १९ या महामारीच्या पार्श्वभूमीवर उपरोक्त अडचण लक्षात घेता जानेवारी / फेब्रुवारी -२०२१ मध्ये प्रस्तावित परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची उपस्थिती ४०% असल्यास विद्यार्थ्यांना परीक्षेस बसण्यास परवानगी देत आहे. जेणेकरून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी संधी मिळेल. त्यानुसार योग्य ती कार्यवाही सर्व संबंधितांनी करावी.

**(तुकाराम सुपे)**
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०१.**

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव:**
१) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व).
२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व).
३) शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उ/द/प)

E:\s\letter\Mantralay Patr.docx(SG)